महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य


३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४४२, ४४३,

ई-मेल–desk2@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in


क्र. २/ एनजीसी/फार्मसी/मान्यता/(२४/२०२२)/११८७ दिनांक: 15 DEC 2022

प्रति,

प्राचार्य,

अमृतवाहिनी शेती व शिक्षण विकास संस्थेचे

अमृतवाहिनी इन्स्टिटयूट ऑफ फार्मसी,

अमृतनगर, नाशिक पुणे रोड, घुलेवाडी,

ता.संगमनेर - ४२२ ६०८ जि.अहमदनगर

(डीटीई कोड - ५२८७)

विषय : शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून कायम विना-अनुदान तत्त्वावर विद्यमान पदविका संस्थेत नवीन पदवी अभ्यासक्रम सुरू करण्याबाबत.

संदर्भ : शासन निर्णय क्र.मान्यता-२०२२/प्र.क्र.१७७/तांशि-४, दि.०५ डिसेंबर, २०२२.

उपरोक्त विषया संदर्भात आपणास कळविण्यात येते की, फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांनी दिलेल्या मान्यतेस अनुसरुन शासनाने वरील संदर्भाधीन शासन निर्णयान्वये शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून कायम विनाअनुदानित तत्वावर विद्यमान पदविका संस्थेत नवीन पदवी अभ्यासक्रम खाली दर्शविलेल्या प्रवेशक्षमतेसह विहित अटींच्या अधिन राहून सुरू करण्यास परवानगी दिलेली आहे.

| अ.क्र. | अभ्यासक्रमाचे नांव | प्रवेश क्षमता |
|---|---|---|
| १ | बी.फार्मसी | ६० |

आपल्या संस्थेने शासन निर्णयात नमूद केलेल्या अटी व इतर अटी यांचे पालन करण्याबाबत नोंदणीकृत हमीपत्र प्रपत्र “अ” व “ब” या संचालनालयास सादर केलेले आहे. आपल्या संस्थेने शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून कायम विना अनुदान तत्वावर विद्यमान पदविका संस्थेत नवीन पदवी अभ्यासक्रम सुरु करण्यास नियतठेव म्हणून रु.४.५० लाख पावती क्र. ०००३८५९६४ दि. ०७.१२.२०२२, अन्वये युनियन बँक ऑफ इंडिया, शाखा - घुलेवाडी (संगमनेर) येथे संस्थेचे अध्यक्ष व संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या संयुक्त खात्यात १० वर्षासाठी जमा केलेले आहेत.

संदर्भांकित शासन निर्णयात विहित केलेल्या अटी व शर्ती सह खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून कायम विना अनुदान तत्वावर वरीलप्रमाणे विद्यमान पदविका संस्थेत नवीन पदवी अभ्यासक्रम सुरु करण्यास व संबंधित विद्यापीठाची संलग्नता प्राप्त झाल्यानंतर विद्यार्थ्यांना विहित पध्दतीने प्रवेश देण्यास या संचालनालयाकडून परवानगी देण्यात येत आहे.

१. संचालक, किंवा त्यांचे प्रतिनिधी यांना फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली तसेच शासनाच्या मानकाप्रमाणे जागा, इमारत, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी व इतर सोयीसुविधा उपलब्ध आहेत किंवा कसे याबाबत संस्थेत केव्हाही अचानक भेट देऊन तपासणी करण्याचे अधिकार राहतील.

२. संचालनालयाच्या माहिती तंत्रज्ञान कक्षाकडून दिलेल्या संकेतांक क्रमाक व पासवर्डद्वारे शुल्क नियामक प्राधिकरणाने निश्चित केलेल्या शुल्कासंबंधीत व संस्थेची इतर सर्व बाबीसंबंधीची माहिती संस्था वेळोवेळी अद्ययावत करतील.

३. संस्थेने प्रवेशासाठी संबंधित पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांची प्रवेश नियामक प्राधिकरण यांचेकडे, तसेच संबंधित पदविका अभ्यासक्रमांची तंत्र शिक्षण संचालनालय यांचेकडे नोंदणी व तद्अनुषंगिक कार्यवाही करणे आवश्यक राहील.

४. शासनाने, या संचालनालयाने, **डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे** व फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांनी वेळोवेळी ठरवून दिलेल्या अटी व शर्तीचे संस्था उल्लंघन करीत असल्यास सदरची संस्था बंद करण्याचे अधिकार शासन/फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली, यांना राहतील.

५. प्रस्तूत अभ्यासक्रमांना डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, रायगड यांचे तात्पुरत्या संलग्नतेचे अधिन राहून मान्यता देण्यात येत आहे. तथापि विद्यापीठाच्या अंतिम संलग्नेतेशिवाय शै.व.२०२२-२३ च्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रीयेमध्ये समोवश केला जाणार नाही याची संबंधित संस्थेने नोंद घ्यावी.

उपरोक्त सर्व अटी व शर्ती, शासन निर्णयातील सर्व अटी व शर्ती व वेळोवेळी शासन / संचालनालय यांनी निर्गमित केलेल्या आदेशांचे काटेकोर पालन करणे आपणास बंधनकारक राहील.

(डॉ.अभय वाघ)
संचालक
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत- मा. प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२ यांना माहितीसाठी सादर.

प्रत माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित :

१. मा. आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण, महाराष्ट्र शासन, ९ वा मजला, न्यु एक्सलसियर इमारत, ए.के. नायर मार्ग, फोर्ट, मुंबई ४०० ००१
त्यांना विनंती करण्यात येते की, प्रस्तूत संस्थेने आपल्या कार्यालयाकडे नोंदणी केल्याशिवाय प्रस्तूत अभ्यासक्रमांस प्रवेश करण्यात येऊ नयेत.
२. मा. कुलसचिव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे
३. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नाशिक.
४. कार्यासन क्र. २अ मुख्य कार्यालय, मुंबई.
५. कायांसन क्र.३ आयटी सेल, मुख्य कार्यालय, मुंबई.
६. निवड नस्तीस.